द्वितीय क्रमांक

~~क्रमांक~~ :- श्रीमती वैशाली राऊत (१४)

"मी" (सत्य घटनेवर आधारीत)

कथा स्पर्धा

# पुनर्भेट

नवीन उच्चस्तर नोकरीच्या निमित्ताने अमेरीकेस जाण्याच्या संधीचा प्रस्ताव ह्यांनी मांडला आणि मी काहीश्या नाखुशीनेच त्याला होकार दिला. मोठा मुलगा अमेरीकेत असतांना दुसऱ्यांदा अमेरीकेस जाण्याची परवानगी देतांना आई (सासुबाई) खरोखरी भावूक झाल्या होत्या.

काही दिवसांनी ह्यांनी सॅनफ्रान्सिस्कोला प्रयाण केले, आणि मी मात्र संमिश्र मनास्थितीतच अमेरीकेला जाण्याच्या तयारीला लागले. माझी शाळा, मुलांची शाळा, प्रेमळ सासुबाई, लाडके माहेर, माझ्या सख्या, आमचे मित्रमंडळ, नातेवाईक या सर्वांनाच टाटा करुन निघतांना मन आनंद-दुःखाच्या संमिश्र भावनांनी गलबलून गेले होते.

अशा मनास्थितीत माझा १ला विमान प्रवास सुरु झाला. त्या काळच्या एअर इंडियाच्या मोठ्या विमानाने मुंबई ते न्यूयॉर्क असा प्रवास सुरु झाला.

परंतु पहिला (होल्ट) यांना भेटण्याच्या अवाढव्य न्यूयॉर्कला विमानाला उतरण्यास काही कारणास्तव तीन तास उशीर झाला. पुढील फ्लाईट निघून गेलेले. न्यूयॉर्कला रात्रीचे वास्तव्य करणे भाग पडले.

FOR EDUCATIONAL USE



Scanned with OKEN Scanner

तलंक, धिप्पाउ सिक्युरीटी बरोबर डोरेक्टर गेलो. बोचरी थंडी, रस्त्यावर बर्फाचा सॅन्डविच पण मी मात्रा शिलोपायी घामाने नखशीखांत भिजले होते. सोबत दोन लहान मुले. रात्रभर जराही डोळा लागला नाही. दुसऱ्या दिवशी न्यूयॉर्क - शिकागो - सॅनफ्रान्सिस्को अशी सफर केली. डाअरपोर्टवर ह्यांना पाहून गुदमरलेला श्वास टाकला, अन निश्चिंत झाले.

आमचे राहण्याचे गाव ~~Ald~~ 'Alamida' हे एक छोटेसे बेट आहे. चारी बाजूंनी समुद्राने वेढलेला, सुरेख हिरवागार भूप्रदेश. अलमेडा हे सॅनफ्रान्सि-सिस्कोशी समुद्राखालील भूयारी रस्ता (टनेल), आणि भुयारी रस्ते, छोट्या ब्रीज ह्यांनी जोडलेले आहे. तेथे ह्यांनी घर घेतले होते. घराजवळच्या डिस्ट्रीक्ट पब्लिक स्कूलमध्ये विनासायास मुलांचे प्रवेश झाले.

माझा शिक्षकी पेशा मला घरात स्वस्थ बसू देईना. चार महिन्यांचा डाक टिचर्स ओरिएंटेशन कोर्स करुन मी गार्नेट प्रि. अँन्ड प्रायमरी स्कूलमध्ये सहाय्यक शिक्षिका म्हणून काम करु लागले. आमचे सर्व घराणे शिक्षकी पेशाचे. अध्यापनाचे बाळकडू मला लहानपणीच मिळाले होते. विविध सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या त्या शाळेत मी लगेचच रुळले. त्याचे कारण असे की गोंडस गोरे पान, लाल गाल, पाणीदार निळे, करडे डोळे असणारे माईक, सॅम, मेलिंडा, जेनिफर, मॉय आणि मारसा. हा मारसा चार वर्षाचा पण सहा वर्षाचा वाटे, अंगकाठी सुदृढ पण बांधेसूद. चटकन डोळ्यात त्याचे रुपडे भरेल असा हा मारसा!

अगदी पहिल्याच दिवशी मारसा गालातला गालांत हसत मजजवळ आला. आणि हळूहळू

FOR EDUCATIONAL USE

मासा जवळून गेला मऊ मुलायम बोटांनी स्पर्श केला. How cute red circular! मी देखील खिळखिळून हसले. त्याच्या गोलश्या गालाची पापी घेतली अन् त्या दिवसापासून मी आणि मासा एकमेकांचे घट्ट मित्र बनलो. २५ विद्यार्थ्यांच्या वर्गात मासा लवकरच माझ्या जवळ आला.

एक दिवस मासा धावत धावत आला. सोली Tomorrow I won't come to school. माझ्या चेहऱ्यावर मोठे प्रश्नचिन्ह ?? Why? I have to go for my dad marriage. मी परकलेच !! अमेरीकन उच्चाराचा मला थोडासा अडसर होताच. मनाशी म्हटले "आपल्या ऐकण्यात नक्कीच गफलत झालेली दिसते." पुन्हा मी त्याला शाळेत न येण्याचे कारण विचारले स्पष्टपणे मासाने पुन्हा तेच कारण सांगितले Attend my dad marriage. मी स्तब्ध! अंतर्मुख झाले. काहीच सुचेना. तिसऱ्या दिवशी मासा वर्गात शिरला, अन् त्याला पहाताच मलाच अपराध्यासारखे वाटू लागले. मी मासाकडे पहायचे टाळू लागले. मासा मात्र मस्तच होता.

एकदा मासा माझ्या कानाजवळ येऊन कुजबुजला "सोली, will you baby sit me on coming Sat/Sund! प्रश्नार्थक मुद्रेने मी मासाकडे पाहिले. "my new mother said that."

मासा पुरपुरला. एका क्षणात त्याच्या घरातील नात्यांचे चित्र माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले आणि मी त्याला baby siting साठी चक्क होकार दिला.

त्या घटनेनंतर मासा माझ्या घरी वरचेवर येऊ लागला. माझ्या दीप आणि गीता बरोबर मासा लवकरच चांगलाच रुळला. नव्हे तो आमच्या कुटुंबाचा एक घटक बनला.

FOR EDUCATIONAL USE

सायंकाळी हातपाय धुवून देवीची आरती, परिपाठ झाल्यावर सहभोजन, सहभोजनानंतर शतपावली, थोडासा अभ्यास, टी. व्ही. पहाणे (कार्टून्स, गेम शो) इ. आणि नंतर गोष्टी सांगत छोट्यांना मांडीवर थोपटीत, अंगाई गीत झोपावले या कृतींची त्याला अपार मज्जा वाटत असे. विज्ञान म्हणतंना मुलांचं सर्वाधिक शिक्षण अन् ज्ञानग्रहण हे ६ वर्षांपर्यंत होत असते. रोप आणि मासावर असे अनेक संस्कार होत होते.

शनिवारी रविवारी मुलांना घेऊन आम्ही बगीचा, म्युझियम, समुद्र सफर, मित्रमंडळींची भेट, सर्वांचीच करमणूक होईल असा चित्रपट इ. साठी जात असू. बेबी सिटींगच्या दिवशी अगदी मासा सुद्धा ग्रोसरी (वाणसामान) आणण्यासाठीही तयार असे. मलाही ते सुखकारक वाटे. कारण विद्यार्थ्यांच्या मुखावरील हास्य शिक्षकांना अपार समाधान, मनस्वास्थ्य देते.

अमेरीकेत रहात असूनही मी आणि माझं कुटुंब भारतीय जीवन पद्धती जगत होतो. संस्कृती जपत होतो आणि आनंद वाटून घेत होतो. माझ्या माहितीनुसार अमेरीकन संस्कृती, जीवन शैली ही आपणास बरीचशी विरोधाभासी जाणवते. अमेरीकन जीवन पद्धतीनुसार तेथे कामाची समसमान विभागणी असते. मुलं ३/४ वर्षांपासूनच स्वयंसिद्ध बनतात. अन् ५ व्या वर्षी फ्रीज मधून ब्रेड, बटर, जॅम घेऊन आपला सॅन्डविच तयार करतात. तोच वेळ वाकडा सॅन्डविच जेवण म्हणून खातात.

परंतु मंडळी ठावठे मात्र निश्चित की ही मुले फारच लवकर विविध प्रकारचे सॅन्डविच बनवू लागतात. Practice makes a man perfect. आई बाबांचा पैशांचा हिशोब वेगवेगळा असतो. ठावठेच काय? आई काळा विसकत झालेले

FOR EDUCATIONAL USE

असलीतर मुलांची विभागणी समसमान होते. त्यानुसार ते मुलांचा खर्च करतात, आणि या पुढील पायरी म्हणजे आई बाबा दोघांनी ही जबाबदारी टाळलीतर, या मुलांची जबाबदारी अमेरीकन चर्च स्विकारते.

"जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे." केवळ व्यवहाराच्या चाकोरीत बसलेले अमेरीकन जीवन ते कोवळे मुलही त्या निर्जीव वातावरणाला हळूहळू स्विकारु लागते.

सगळी कोरडी माया, चोथा झालेली ममता, निर्जीव प्रेम. या अमेरीकन संस्कृतीचा विचार करुन मी अनेकदा सुन्न होत असे, पेन मासाच्या आधिक्य जवळ सरकत असे. सख्या आईविना वाढणाऱ्या मासाबद्दलची अनुकंपा जागृत होत असे त्याची किव येत असे. बेबीसिटींगच्या दिवशी मात्र माझ्या अंगावर आपले गोरेपान हात टाकून, मला बिलगून मासा निधास्तपणे झोपत असे. त्यावेळी त्याचा चेहरा निरागस, निर्मळ, निर्मोही दिसत असे. घरी जाताना मात्र त्याची पाऊले जड होत, चेहरा कोमजून जाई.

एक जीवघेणा क्षण उद्‌भवला !!

एक दिवस मासाचे बाबा शाळेत आले. शाळेतून त्याचे नाव काढण्याचे सर्व कामकाज पूर्ण करुन शे... ते मला भेटण्यास आले हाय केले!

"Massa won't come to school from tomorrow. but sometimes he can come to your house for baby siting." त्या वाक्याने मात्र मनाला थोडी उभारी आ... Something is better than nothing. बाय बाय - थंडपणे मासाने घेतलेला निरोप अगदी बर्फवत वाटला... मात्र मासाला जेव्हा "won't come to

school' ह्या वाक्याचा बोध झाला तेव्हा हारवादच्या तडफडणाऱ्या पक्षाच्या शानुलनिक वेगाने त्याने आम्हा दोघांमधील अंतर कापले आणी तो मला धरू बिलगला. दोघांनाही राहवले नाही. आमच्या डोळ्यांना पाण्याच्या धारा लागल्या आणी काय काय करून रडवेल्या डोळ्यांनीच आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. एकमेकांचे हात पकडून 'अलविदा' केला. गदगदलेल्या अंतःकरणाने मी मासाला निरोप दिला. परंतु त्या दुःखद वातावरणात, विमनस्क अवस्थेतही चतुर मुलाने मला विचारून माझा फोन नंबर स्वतः कागदाच्या चिटोऱ्यावर लिहून आपल्या जीनच्या खिशात कोंबला. त्या मधु वर्षाच्या चिमुरड्याने माझ्या पर्समधील त्याच्या परिचयाची गणपतीची तसबीर मागून घेतली. तीला नमस्कार केला. (अगदी आपल्या हिंदू पद्धतीने.) आणी झरकन वळला.

दुसऱ्या दिवशी पहाटे पहाटे फोनची रिंग खण-खणली. मलाही मासाच्या गोड्य संकेत मिळाला. "हाय सॉरी" "हाय मासा" !! How are you? How is Deep? दोघांचेही डोळे पाण्याने डबडबले होते. शब्द फुटत नव्हते. ओठ ओलेचिंब झाले होते. शब्द फुटतच नव्हते. फोनच्या रिसीव्हरची स्थितीही तशीच !! पण इतक्यात दीप आणी गीताने मासाला फोनवर 'हाय' केले, अन फोनला अखेरीस वाचा फुटली. वातावरण बरंचसे निवळले. आणी सुखद झाले.

त्यानंतर मात्र मासाचा सकाळी येणारा फोन त्याच्या मधुर भाषेतील 'हाय' 'हाय' 'हाय' ही त्रिवेणी साद! हाच नित्याचा करमणुकीचा कार्यक्रम होऊन गेला.

FOR EDUCATIONAL USE



Scanned with OKEN Scanner

नातीन आणि घरी आल्यापासून मासाचे माझ्याकडे बेबीसिटींग वाढतच गेले. आरत्या, रामरक्षा, गणपती अथर्वशीर्ष इ० सामुदायिक पठण आम्ही करीत असू. आता ६ वर्षांचा तीक्ष्ण बुद्धीचा, अफाट स्मरण शक्तीच्या मासाने रोपच्या बरोबरीने पाठांतर केलेच. काही वेळा गीतेच्याही पुढे जाऊनही तो पठण करीत असे. मला मासामध्ये उपासना, धार्मिक पाठांतर, स्तवन इ० विशेष आवड जाणवत असे. शनिवारी, रविवारी येणाऱ्या सणांच्या दिवशी मास्या बेबीसिटींगसाठी मुद्दामच येण्याचा हट्ट करीत असे.

गणपती, दसरा, दिवाळी इ. सणांची मजा तो आमच्याबरोबर लुटत असे. मासाच्या वृत्तीचा गाभा धार्मिक होता हे मला वेळोवेळी जाणवत होते. मराठी संस्कारात तो रममाण होत असे.

"मना घडवी संस्कार"

हे मात्र खरे!

मासे पती ज्या विदेशी अकांउटींग कंपनीत उच्चपदावर कार्यरत होते, त्या जॉन्सन अकांउटींग कंपनीची एक मोठी शाखा भारतात मुंबई येथे सुरु झाली, मग त्या ठिकाणी पतीदेवांची सी.जी.एम. (चीफ जनरल मॅनेजर) ह्या उच्चपदावर नियुक्ती झाली.

अन आमची मायदेशाला परत जाण्यासाठी प्रवासाची पुनरावृत्ती विचाराधीन झाली. पतीचे उच्चतम पद, मायदेशी परतावणी, माझ्या मराठी शाळेचा पुन्हा सहवास, मुलांना आजी-आजोबांचा सहवास, नातवंड, मित्रमैत्रिणींचा सहवास ह्या सुखद कल्पनेने सुखावलो होतोच परंतु त्याचबरोबर डोळ्यांसमोर एक माझ्या FOR EDUCATIONAL USE कायमचे दिसत हो

ते मासाचे ! ५० वर्षांचा मासा ! आमच्यात रमणारा मासा ! त्यास आमच्या भारताच्या परतीच्या बेताबद्दल बोलण्यास मी अद्याप धजावले नव्हते. कारण त्याच्या दृष्टीने ही खेदजनक बातमी, तो कसा स्वीकारेल ? हीच माझी चिंता !!

परंतु मासा लहानग्या दीपु, जो मासाचा जिगरी दोस्त, त्याद्वारे गुपीत हे गुपीतच ठेवायचे असते ही बाब त्याच्या छोट्या वयानुसार तो पूर्णपणे विसरला, आणि त्याने लाऊडस्पीकरच्या वाढीव व्हॉल्युममध्ये आमच्या भारत परतीची बातमी मासाला अगदी मीठमसाला लावून सांगितली.

मासा अवाक !! त्याचा पहिला प्रश्न होता, तुम्ही कायमसाठी भारतात जात आहात का ? दीप उत्तरला, अर्थात, अन् मासा मंचावरून खाली. मी स्वयंपाकघरात होते, तेथून सुद्धा मला त्याच्या डबडबलेल्या डोळ्यातून ओघळते टपोरे अश्रू दिसले. मासेही ओघळ लागोलाग पाणावले. मासा दिवसभर गप्प गप्पच होता. आवडीची बटाट्याची भाजी त्याने खाल्ली नाही. दीपची त्याच्याशी जमणारी टक्कर दिवसभर चालूच होती, परंतु मासा मात्र मख्खच ! रात्री 'सांगी ध्रुवबाळाची गोष्ट सांग' असे मागणे नाही. तो एकटक छताकडे पहात बसलेला होता. मी माझा हात त्याच्या हातात दिला, कधी नव्हे तो त्याने त्वरीत झटकला. त्याचे नाक फुरफुरत होते. मी देखील काहीशा अस्वस्थपणानेच कधी झोपी गेले ते कळले नाही, पण मला जाग आली ती मासाच्या कण्हण्याने. झोपेत मासा चांगलाच मुसमुसत होता. दुसऱ्या दिवशी मासा त्याच्या घरी गेला.

त्याच दिवशी संध्याकाळी मासाच्या वडिलांचा फोन आला : " Masa is sick" दोन दिवस विवंचनेत

FOR EDUCATIONAL USE

गेले. मलाच अपराध्यासारखे वाटत होते. तिसऱ्याच दिवशी फोन खणखणला. हॅलो! सॅली, Mass is sick! but he wants to come your house for baby siting. will you? हो नक्कीच. मी त्वरीत उत्तरले. आणि काही वेळातच स्याम (डॅडी) मासाला घेऊन घरी हजर. मासा गालातल्या गालात हसत होता. त्यानंतर मासाच्या दररोजच्या सकाळच्या हाय हाय च्या तारस्वरात झालेला म्हण (कमी व्हॉल्युम) बदल मला तो ओळखत नव्हता. मासाच्या नजरेला नजर देण्यास माझे डोळे धजावत नव्हते. मासा मात्र आता रे असे की मासा हात आधीकाधीक घट्ट पकडून मला अधीकच बिलगू लागला. रात्री झोपतेही त्याची मिठी अधीकाधीक घट्ट होऊ लागली. झोपेत तो बडबडू लागला होता, सॅली, I come India! Come India!! सॅली इंडिया असे अस्पष्ट शब्द तो पुटपुटू लागला. अखेर एक दिवस त्याने अगदी समोरासमोर मला हा प्रश्न विचारलाच, सॅली, Can I come to India with you? मी अचंबीत! अविचल, अस्फूट!! मासाकडून हा प्रश्न येणारच हे मी जाणून होतेच, परंतु काहीना काही कारणे देऊन, मी तुझ्या बरोबर इंडियाला येऊ का! ह्या महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे टाळीत होते. परंतु पढील दोन, तीन दिवसातच माझी दांडी उडाली. रात्रभर रडून रडून सुजलेल्या लालबुंद डोळ्यांनी मला अखेरीस बोलते केले.

मासा, तुझे जन्मस्थान अमेरीका (अलामेडा) म्हणजे तू जन्मानुसार 'अमेरीकन' रहिवासी आहेस, तसेच सध्या तुझा वयाचा अडसर आहे. You are a child. तेव्हा तू माझ्याबरोबर आता येऊ शकणार नाहीस. परंतु थोडा मोठा झाल्यावर

FOR EDUCATIONAL USE

(१२ वर्ष पूर्ण) जर काही कारणाने तुला भारतात ये
मिळाले तर तुला माझ्याघरी नक्की भेट देता
येईल. असे समजावले.

ज्या दिवशी मी भारत भेटीला कधी आणि क
येता येईल ! हे सैरभैर झालेल्या मासाला माझ्या
कडून समजावण्याचा प्रयत्न केला. त्याच्या दुसऱ्या
दिवसापासून मला मासामध्ये अचानक बदल
लागला. त्याच्या इवलाशा डोळ्यातून वेगळेच
दिसू लागले. तो मला सामान बांधणीत आपणहू
मदत करू लागला. तो आता कधीही बेबीसिटिंग
येत असे. काहीवेळा तो माझ्याकडे रविवारीही रा
सोमवारी माझ्या घरूनच शाळेत जाई. माझ्याघरी
मासा पूर्णपणे मराठीतून बोलण्याचा प्रयत्न करीत ह
त्याचे धार्मिक पाठांतर, वाचन इ. चालूच होते

अन अखेरीस मायदेशी जाण्यासाठी परती
विमान प्रवासाचा दिवस ठरला. मासाच्या डॅडीन
मोठ्यामोठ्या गाडीतूनच आमच्या सर्व सामानाचे पे
भरून आम्ही सर्व जण (स्याम अन मासासह
न्यूयार्क डाअरपोर्टवर आलो.

आल्या आल्या भारतीय नमस्कार करून म
अस्खलीत मराठीत म्हणाला, 'सर्व, काही विशे
कारणाने मी भारतात नक्की येणारच ! तुम्हा
सर्वांना भेटणारच ! टाटा करण्यासाठी त्याचे गोरेप
हात गोल गोल फिरत होते.

विमानतळावर आलेला मासा परोपरी डा
वाक्य बोलत होता. ठामपणे ! "सर्व, भारतात आ
नक्की भेटूच !' केवढा हा ध्यास !! मनोनिग्रह
त्या इवल्याशा जीवाचा !

आम्ही भारतात घरी आल्यावर दररोज
सकाळच्या मासांच्या हॅलो ! हॅलो ! हॅ

FOR EDUCATIONAL USE

हया तीनार हाकेच्या फोनची रचीव चावून राहिले, त्यामुळे मलाला सकाळी सकाळी उभारी येत होती. थोड्यात कालावधीत मुले आपल्या शाळेत आणि शालेय कार्यक्रमात चांगलीच रमली. मी सुद्धा लवकरच माझ्या पूर्वीच्या शाळेत चांगलीच रुळले. नवरोजीना तर काय ! जॉन्सन ॲन्ड जॉन्सन इंजिनिअरींग कंपनी म्हणजेच त्यांची सर्वोत्सवी झाली.

त्यामुळे मासाच्या फोनवरील बडबडीला प्रतिसाद देणारी माझी फोनची बाजू तांबी-रंदीने कमी झाली. मासामात्र फोनवर बालोपासनेतील एक एक श्लोक म्हणून दाखवीत असे. फोनवर सूर्यनमस्कार घातल्याचे सांगत असे. कधी कधी इकडे नवीन श्लोक को कवन म्हणून घेत असे. तो आता मराठीही बऱ्यापैकी छान लिहू लागला होता. नरनंतर त्याचे पाठांतर, जयहो !! अमेरीकेतील हिंदू मंदिरातील शनिवारच्या मराठी संस्कारवर्ग तो कधीही चुकवीत नसे. मासांची मराठी भाषेची अंतरीक ओढ ! संस्कारवर्गाची आस !!

हाच मासा आणि सेली मधील अखंड दुवा होता.

भारतात परतल्यानंतर मी आत्मकथनाचे कार्यक्रम सुरू केले. " अमेरीकन शाळेतील महाराष्ट्रीयन शिक्षिका " त्या व्याख्यानाचे पहिले वाक्य अमेरीकेतील माझा पहिला विद्यार्थी मासा " ! हाच मासाच्या नावाचा मी घेतलेला वसा - त्यामुळे कार्यक्रम सुरू करतांना हसरा मासा माझ्या डोळ्यासमोर येई, आणि अमेरीकन शाळेतील महाराष्ट्रीय शिक्षिके मास व्याख्यान ( आत्मकथन ) रंगत जाई. टाळ्या आणि वन्समोअर घेई. हा तमुचा आशीर्वाद !

वर्षे सरकत होती मासा १२ वर्षांचा

FOR EDUCATIONAL USE

बिग बॉस सारखा होता. असा बिग बॉस मधून मधून
हिंदू मंदिर आणी चर्च मध्ये राहू लागला होता.
चर्च म्हणजे येशु ख्रिस्ताचे मंदिर. माझ्या
अमेरीकेत सर्वाधिक प्रिय असणारी वास्तु म्हणजे
चर्च. नेहमीची शाळा, संडे स्कूल, वैद्यकिय शिबीरे
सहली बाप्तिस्मा, बायबल स्कूल, विविध विषयावर
मार्गदर्शनपर व्याख्याने, जेष्ठ नागरीकांसाठी विविध
उपक्रम, चित्रपट, गरीबांसाठी भोजन व्यवस्था
बालसंगोपन केन्द्र, लग्न, दफनभूमी इत्यादी इत्यादी
विविधांगी कार्यरत असणारी सेवाभावी संस्था म्हणजे
चर्च. या ठिकाणी माझा छोटी-मोठी कामे करु
लागला होता. तसेच तो काहीवेळा हिंदू देऊळ
मध्येही रहात होता. अभ्यास करत होता.
पूजा, आरती, रुद्र, अभिषेक इ. हळू हळू करु
लागला होता. "सर्व धर्म समभाव" हाच माझा
स्वभावधर्म होता!

ह्या शिवाय आपल्या डेड आणी नविन मॉम
ला मदत करण्याचे त्याचे कर्तव्य तो आनंदाने
पार पाडीत होता. कोठेही कुरकुर नाही. तसेच
ती अनेक प्रायमरी स्कूलचे स्मरण ह्या कार्यांची
त्याला सदा जाणीव असे.

माझाची स्मरणशक्ती आणी कर्तव्यदक्षता
दोन्हीही एकू करुन टाकील.

वर्षे सरकत होती. माझी मुलेही मोठी होत
होती. त्यांच्या शाळा, कॉलेजच्या विविधवेळा मुळे,
आणि भारत व अमेरीका यांच्या वेळातील फरका-
मुळे फोन प्रकरण बाजूलाच पडत चालले होते.
आम्हीही सगळे भारतीय दिनचर्येत पूर्णपणे व्यस्त
होतो. कंपनीच्या कामानिमित्ताने ह्यांची अमेरीकेला
होई परंतु अगदी धावपळीत. कधी

FOR EDUCATIONAL USE

कुणालाच न मिळाला. वर्ष जात होती गेली आणि मासीही शाळेमध्ये रमली. शालेय काम मी उत्तमप्रकारे पोहचवले मासी. बाकीच्या नावींना बालमनाला व्यासाठी वाढदिवस, वाढी मैत्र बाकीच्या आठवणी ! मिस्टर पद त्यागला. त्यात मासा ही आठवण !

मासा हॅरवीड दीप प्रमाणे हायस्कूलमध्ये असणार इतकीच जाणीव तीव्र होती. बाकी आठवणी मनाच्या कुपीत जपलेल्या होत्या. अगदीच एकटी कधीकाळी असेल तर आठवणींचा शीसा अलगद उघडला जाई आणि मासाच्या स्मरणात मन रममाण होई. बस इतकेच ! पुन: नेहमीचा जीवनक्रम चालूच !

अशी बरीच वर्षे गेली.

एक दिवस सकाळी मी स्वयंपाकघरात कामात होते. तोच हमांनी हाकारा दिला.

वर्तमानपत्रात ठळक अक्षरांत बातमी

" संस्कार संस्कार "

अमेरिकेतील शाळेमधील 'मासामुकी' ह्या अमेरिकन विद्यार्थ्याचे भारतात मराठीतून संस्कार पठण.

माझ्यापुरते माझ्या सुरवात मासाचे नाव केवळ 'मासा' होते. नावाचा उत्तरार्ध मला माहितही नव्हता. त्यामुळे 'मासामुकी' ह्या चार अक्षरी नावाने माझ्या मासाचा मला बोध होईना.

मेलमेडातील हिंदू टेंपल मधील संस्कार वर्गास नियमितपणे येणाऱ्या आणि सॅलीकडे नियमितपणे बेबीसिटींगसाठी येणाऱ्या मासाची आठवण चांगलीच चाळवली गेली.

काय योगायोग बघा ! परमेश्वरी लीला अगाध आहे. आमच्या शाळेत जिल्ह्यातील प्रमुख केन्द्र असल्यामुळे शाळेत निमंत्रण आले. मुंबईच्या यशवंत-राव सभागृहात मी दोन FOR EDUCATIONAL USE विद्यार्थ्यांसह शाळेची

प्रातिनिधी म्हणून हजर झाले. तरी पण कोण असेल मन खाली वर होत होते.

मासामुनी !

अमेरीकेतील भारतीय सॅलीकडे सर्व प्रथम, संस्कार पठण शीकणारा माझा मासा असेल का ! गोऱ्या गोऱ्या लालबुंद गालांचा, उजव्या गालाच्या तळाशी लालसर खालच्या ओठाजवळ काळाभोर तीळ असणारा, सज्जन वाड्याचा माझा मासा भारतात येऊन हे संस्कार पठण !!

मी स्तब्ध झाले.

नियोजीत वेळेप्रमाणे यथावकाश सभागृहाचा पडदा उघडला अन् काय आश्चर्य !!

साधारण १५/१६ वर्षाचा हसतमुख मवाळमित व्यासपीठावर बसलेले दिसले.

ओम नमः शिवाय !!

गणपती बाप्पा मोरया !!

निवेदकाने परिचयाला सुरवात केली. मासामुने अमेरीकेतील कॅलीफोर्निया स्टेट मधील अलामेडा बे वरील गार्नर हायस्कूलचा विद्यार्थी इ. ८ वी मध्ये शिकत आहे.

परिचय, परीचयाचा जागवला. स्टेजपासून बऱ्यापैकी जवळ असलेल्या माझ्या जागेवरुन मी शोधीत असलेला काळाभोर तीळ मनुनही दिसत नव्हता. कारण थोडे मेकअप फुरफुस होते. माझे डोळे निरीक्षण चालू होते.

अन् तेवढ्यात — — —

त्याने आपल्या बॅकप्याक मधून दोन फ्रेम्स काढून टेबलावर मांडल्या एक - माझ्या पर्समधून माझ्या परवानगीने घेतलेली गणपतीची तसबीर आणि दुसरी मी, माझे कुटुंबीय आणि FOR EDUCATIONAL USE मासा !

तेवढ्यात डोक्यात प्रकाश पडला. ती वाक्ये कानात घुमू लागली. 'सॅली, मी भारतभेटीला येणारच! मी इंडियात येणारच! सॅलीला भेटायला येणारच! काहीतरी विशेष कारणानेच!

तेवढ्यात कानावर गोड शब्द पडले. नमस्कार!! ओम् गं गणपतये नमः

नंतर आमच्या प्रेमळ प्रमाने पाहून नमस्कार करून बोलले "सॅली, माझ्या अमेरिकेतील संस्कार वर्गाच्या पहिल्या शिक्षिका!!

शब्द कानावर पडले आणि मन उचंबळून आले. हा मासाच "मासा"!! माझ्या बेबीसिटींगच्या पहिला सदस्य.

मासाने अस्खलीत मराठी मधून पठणास सुरवात केली. मारुती स्तोत्र, रामरक्षा, हनुमान चालीसा, गणपती अथर्वशीर्ष, मनाचे श्लोक २० निरुपणासह घडाघड बोलत होता.

जणूकाही मासा आपल्या पुनर्भेटीची पावती मला देत होता. माझी गुरुदक्षिणा मासाच्या डोळ्यातून ओघंबून वहात होती. त्याच्या डोळ्यांना अश्रूंची धार लागली होती.

नकळत माझे दोन्ही हात उंचावले गेले. चाणाक्ष मासाने ते बरोबर टिपले. कार्यक्रमानंतर लांब लांब टांगा टाकीत तो मजपाशी आला. मला वाकून वंदन केले. आणि ओला मात्र तो बोलला - वस्थेत गेला. 'सॅली, will you baby sit me Please!

मी उत्तरले " Certainly yes"

मासाच्या संस्कार पठणाच्या कार्यक्रमानंतर नियोजित स्नेहभोजन गोड बोलून नाकारले आणि माझ्याघरी येण्यासाठी गाडीत जाऊन बसला सुद्धा!

FOR EDUCATIONAL USE

प्रथम सरांची व मासी आदरपूर्वक ओळख करून दिली. सरांकडून १ दिवसाची रजेची लेखी अनुमती मिळवूनच तो गाडीत बसला होता.
गाडीतच मासाचा पुढील प्लॅन तयार होता.
सॅली : तू पिठलं अन भाकरी करशील का ?
मी लगेचच उत्तरले हो, नक्की !
घरी गेल्यानंतर सगळ्यांच्या मैत्रिणींनी भेटी- मुळे सगळ्यांनाच आश्चर्य आणि आनंद वाटला.
जेवणापूर्वी धार्मिक पाठांतर देवासमोर झाले त्यानंतर सर्वांनीच पिठलं, भाकरी चापली. सोबत कढीही प्यायले. जेवणानंतर शतपावली झाली. पूर्वीप्रमाणे विनोदी किस्से सांगत सांगत, मुलांच्या बालपणीच्या गोष्टींची पण पुनर्भेट झाली. अखेरीस पूर्वीच्या आठवणींना उजाळा देत देत बऱ्याच उशीराने दोघं जण झोपेच्या आधीन झाले.
हीच मासा आणि सॅलीची अर्थपूर्ण

## पुनर्भेट

सॅलीच्या पुनर्भेटीने कृतकृत्य झालेला मासा दुसऱ्या दिवशी समाधानाने आपल्या सरांबरोबर हिरू टेकडीमधील संस्कार वर्गाला गेला.
मंडळी,
एखादी इच्छा मनापासून, आंतरीक ओढीने रुजविली तर ती नक्कीच फलद्रूप होते, मग तीची फलश्रुती खरोखरीच अवर्णनीय होते.

असं माझ्या मनात आले —

P.T.O

FOR EDUCATIONAL USE



Scanned with OKEN Scanner

अशी पारखे येती
आणिक स्मृती ठेवूनि जाती
दोन दिसांची रंगत संगत
दोन दिसांची नाती — —
कुठे कुणाच्या घडता भेटी
अंतर्यामी असे मानेपा
निघताना होती पुनर्भेटी — —

पुनर्भेटी

कथा - शब्दसंख्या - २७९४